Sakal 21 April 2015




करून पाहूया

आयुका विज्ञान केंद्र, पुणे

# बलून मोबाईल कव्हर

मित्रांनो, तुमच्या किंवा आई-बाबा, ताई-दादा यांच्या मोबाईलसाठी एक भन्नाट मोबाईल कव्हर आज आपण बनवूया. यासाठी तुम्हाला लागणारे साहित्य म्हणजे एक मध्यम आकाराचा फुगा, मोबाईल हँडसेट.



कृती : फुगा फुगवून त्यावर हँडसेट सावकाश दाबावा. एकीकडे फुग्याचे तोंड हळू-हळू सोडा. फुग्यात थोडीशी हवा शिल्लक राहिल्यानंतर फुगा हँडसेटच्या सर्व बाजू कव्हर करतो की नाही, हे पाहा. त्यानंतर फुग्याच्या तोंडाकडील राहिलेला भाग पुन्हा फुगवून त्याला गाठ मारा. आता या तयार झालेल्या छोट्या फुग्याच्या गोलाला पीळ देऊन तुमच्याकडच्या असलेल्या एका स्केचपेनने त्यावर एक चेहरा रेखाटा. तुमचे मोबाईल कव्हर तयार झाले. तुम्ही अशी दोन-तीन मोबाईल कव्हर बनवून तुमच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना देऊ शकता.